**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः06.10.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

१. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राज्य दौऱ्यात वाशिम इथं कृषी क्षेत्रासाठीच्या अनेक योजनांचा प्रारंभ, तर मुंबई, ठाण्यातील पायाभूत सुविधांच्या कामांची पायाभरणी आणि लोकार्पण.**
२. **मराठी भाषेला जागतिक पातळीवर पोहोचवण्याचं पंतप्रधानांचं मराठी भाषकांना आवाहन.**
३. **काँग्रेस सत्तेवर आल्यास आरक्षणाची 50 टक्क्यांची मर्यादा काढून टाकण्याचं राहुल गांधी यांचं कोल्हापुरात आश्वासन.**

**आणि**

४. **पुणे शहर आणि परिसरात महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर अधिक सतर्क राहण्याच्या पोलिसांना सूचना.**

**पंतप्रधान वाशिम**

केंद्र सरकारचा प्रत्येक निर्णय आणि धोरण विकसित भारताचं ध्येय पूर्ण करण्यासाठी समर्पित असून शेतकरी हा या दृष्टिकोनाचा मुख्य आधार आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल वाशिम इथं एका कार्यक्रमात केलं. कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित जवळपास 23 हजार कोटी रुपयांच्या उपक्रमांचा प्रारंभ पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. भटक्या जमाती आणि समुदायांच्या विकासासाठीही सरकार कटिबद्ध असल्याचं ते यावेळी म्हणाले. वाशिम जिल्ह्यातल्या पोहरादेवी इथं बंजारा समाजाच्या समृद्ध परंपरेचं दर्शन घडविणाऱ्या बंजारा विरासत संग्रहालयाचं उद्घाटनही काल पंतप्रधान मोदीं यांनी केलं. भटक्या जमातींचा विकास हा महाराष्ट्र शासनाच्या संत सेवालाल महाराज बंजारा तांडा समृद्धी अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचं त्यांनी नमूद केलं. पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते काल वाशिम इथं पंतप्रधान शेतकरी सन्मान निधीच्या 18 व्या हप्त्याची सुमारे 20 हजार कोटी रुपयांची रक्कम देशभरातील जवळपास साडे नऊ कोटी शेतकऱ्यांना वितरित करण्यात आली. यावेळी बोलताना ते म्हणाले.

***बाईट***

*"पीएम किसान सम्मान निधि की 18वीं किस्त जारी करने का अवसर मिला। देश के साढे नौ करोड़ किसानों के खातों में आज बीस हजार करोड रुपए ट्रांसफर किए गए हैं। महाराष्ट्र के डबल इंजन की सरकार तो यहां के किसानों को डबल फायदा पहुंचा रही है। नमो शेतकरी महासम्मान योजना के तहत महाराष्ट्र के 90 लाख से ज्यादा किसानों को करीब 1900 करोड रुपए दिए गए है।"*

याचवेळी राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेअंतर्गत 19 शे कोटी रुपयांच्या मदतीचंही 90 लाख शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलं. याशिवाय 9 हजार दोनशे कृषी उत्पादक संघटनांसह एक हजार 920 कोटी रुपये खर्चाच्या साडे सात हजार कृषी पायाभूत निधी प्रकल्पांचं लोकार्पणही पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आलं. शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राज्यात उभारण्यात येणाऱ्या १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या जगातल्या सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या पहिल्या पाच सौर उद्यानांचं लोकार्पण मोदी यांच्या हस्ते करण्यात आलं.

पंतप्रधानांच्या कालच्या या एक दिवसाच्या राज्याच्या दौऱ्यात संध्याकाळी ठाण्यात त्यांनी 32 हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या विविध पायाभूत सुविधांच्या कामांचं भूमीपूजन आणि लोकार्पण केलं. त्यामध्ये बीकेसी ते आरे दरम्यानच्या मेट्रो-3 चं उद्घाटन, ठाणे वर्तुळाकार मेट्रो आणि मुंबईतील घाटकोपर जवळच्या छेडा नगरपासून ठाण्यातल्या आनंद नगरपर्यंतच्या पूर्वमुक्त महामार्गाच्या विस्तारीत भागाच्या पायाभरणीचा समावेश आहे. याशिवाय 'नैना' अर्थात नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्रातल्या विकास कामांचा पहिला टप्पा तसंच ठाणे महापालिकेच्या नव्या इमारतीचं भूमीपूजनही पंतप्रधानांच्या हस्ते झालं. महाविकास आघाडी पुन्हा सत्तेत आल्यास महायुती सरकारच्या योजना बंद करेल. त्यांच्या कार्यकाळात सरकारी पैसा महिलांच्या नव्हे तर दलालांच्या हाती जाईल, असा दावा त्यांनी केला. मुंबई महानगर क्षेत्रातल्या विकासकामांमध्ये महाविकास आघाडीनं अडथळे आणले. यामुळं मुंबई मेट्रो 3 प्रकल्पाची किंमत 14 हजार कोटी रुपयांनी वाढली. हा जनतेच्या पैशाचा अपव्यय असल्याचं पंतप्रधान म्हणाले. मुंबईत नव्या मेट्रोच्या उद्घाटनानंतर मोदी यांनी त्यामधून प्रवासदेखील केला. या प्रवासादरम्यान त्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी, विद्यार्थी आणि कामगारांशी संवाद साधला. सर्वसामान्य नागरिकांसाठी सोमवारी पहाटेपासून ही मेट्रो सुरू होणार आहे.

**जाहिरात**

आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागासाठी अंशकालीन वार्ताहर नेमण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. यासंदर्भात सविस्तर जाहिरात न्यूजऑन एआयआर डॉट कॉम या संकेतस्थळावर वेकन्सीज या सदराखाली पाहता येईल. तसंच इच्छुक उमेदवार पुणे वृत्त विभागाच्या 020 255 32 162 या क्रमांकावर देखील संपर्क साधू शकतात.

**या प्रादेशिक बातम्या आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

**मराठी सन्मान**

मराठीला भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आल्यानिमित्त काल मुंबईत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मराठी भाषा सन्मान सोहोळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. अभिजात भाषेचा दर्जा मिळणं हा मराठीसाठी सोनेरी क्षण असल्याचं या सोहोळ्याला संबोधित करताना ते म्हणाले. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानं मराठीच्या विकासाच्या दृष्टीनं कोणते लाभ होतील, भाषा अभ्यासकांना कसा फायदा होईल हे देखील हे मोदी यांनी स्पष्ट केलं.

***बाईट***

*साथियों मराठी को प्रैक्टिकल लैंग्वेज का दर्जा मिलने से मराठी भाषा के अध्ययन को बढ़ावा मिलेगा। साहित्य संग्रह को बढ़ावा मिलेगा।*

*सबसे महत्वपूर्ण बात यह है कि भारत की यूनिवर्सिटी में मराठी भाषा के अध्ययन की सुविधा मिल सकेगी। केंद्र सरकार के फैसले से मराठी भाषा विकास के लिए काम करने वालो के संगठन व्यक्ति और छात्रों को काम करने को बढ़ावा मिलेगा।*

महाराष्ट्रातील महान संत परंपरा, मराठी भाषेचा गौरव वाढविण्यात संत साहित्यानं दिलेलं योगदान, संपूर्ण देशाचं प्रेरणास्थान असलेले छत्रपती शिवाजी महाराज, मराठीला लाभलेली साहित्यिक, पत्रकारांची थोर परंपरा तसंच स्वातंत्र्यलढ्यात लोकांना संघटित करुन, त्यांच्यात जागृती घडवून आणण्यासाठी महाराष्ट्रातल्या नेत्यांनी आणि समाज सुधारकांनी केलेलं कार्य, रंगभूमी, चित्रपट, संगीत या क्षेत्रात आपल्या प्रतिभेनं मोठा नाव लौकिक मिळालेले ख्यातनाम मराठी कलाकार अशा साऱ्यांचा नावानिनिशी उल्लेख करून मोदी यांनी त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले. मराठी भाषकांनी आपल्या भाषेला जागतिक पातळीवर पोहोचवण्याचे प्रयत्न करावेत असं आवाहन करत त्यांनी

आपल्या भाषणाचा समारोप केला. या कार्यक्रमात शिक्षण तथा मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर, ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले, अभिनेते-दिग्दर्शक सचिन पिळगावकर, ज्येष्ठ अभ्यासक डॉक्टर सदानंद मोरे यांचीही भाषणं झाली. या कार्यक्रमाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, केंद्रीय तसंच राज्य मंत्रिमंडळातील मंत्री तसंच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**राहुल गांधी**

काँग्रेस सत्तेवर आल्यास आरक्षणाची 50 टक्क्यांची मर्यादा काढून टाकण्यात येईल तसंच देशात जातनिहाय सर्वेक्षण करण्यात येईल असं आश्वासन लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि खासदार राहुल गांधी यांनी काल दिलं.
कोल्हापुरात आयोजित संविधान सन्मान संमेलनाला संबोधित करताना राहुल गांधी यांनी जातनिहाय जनगणनेसोबतच सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण आणि देशातल्या महत्त्वाच्या संस्थांमधील विविध समाजांच्या सहभागाचं मूल्यमापन होणं गरजेचं असल्याचं सांगितलं. राहुल गांधी यांच्या हस्ते कोल्हापूरच्या कसबा बावडा इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. शिवाजी महाराजांनी जे सांगितलं, त्याचंच संविधान हे 21 व्या शतकातलं रुप असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं.

**नीलम गोऱ्हे**

पुणे शहर आणि परिसरात गेल्या काही दिवसात महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना लक्षात घेता पोलीस विभागानं अधिक सतर्क राहून अशा घटना रोखण्यासाठी गस्त वाढवावी असे निर्देश दिल्याचं विधानपरिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी काल पुण्यात सांगितलं. पुणे पोलीस आयुक्त कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यावेळी उपस्थित होते. महिलांवरील अत्याचाराच्या घटना तसंच इतर गुन्हे टाळण्यासाठी निर्जन स्थळी नागरिकांच्या संरक्षणासाठी गस्त वाढवावी, गस्त घालतेवेळी सायरनचा वापर करावा, निर्जन स्थळी असलेल्या पोलीस चौकी अद्ययावत कराव्यात तसंच अशा ठिकाणी रात्रीच्या वेळी प्रकाश झोत आणि भोंग्यांची व्यवस्था करावी, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे वेळोवेळी देखरेख ठेवावी यासह इतर निर्देश पोलिसांना दिल्याचं डॉक्टर गोऱ्हे यांनी सांगितलं.

**नवरात्र**

शारदीय नवरात्रौत्सवाच्या कालच्या तिसऱ्या दिवशी करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीची चंद्रलांबा परमेश्वरी रुपात पूजा बांधण्यात आली होती. पहिल्या दोन दिवसांत तीन लाखांहून अधिक भाविकांनी अंबाबाई देवीचं दर्शन घेतलं. श्रीक्षेत्र माहूर इथंही लाखो भाविक नवरात्रोत्सवात दर्शनासाठी येत आहेत. काल सकाळी देवीची वैदिक महापूजा, श्री दुर्गासप्तशती शतचंडी पाठ यासह प्रथेनुसार अन्य धार्मिक विधी पार पडले. राज्यभरातून येणाऱ्या भाविकांसाठी इथं पूर्ण व्यवस्था मंदिर समितीच्या वतीनं करण्यात आल्याचं जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सांगितलं.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार**